| **Headline:** NSE organises bell ringing ceremony to celebrate NIFTY 50 @ 10,000 | |
|---|---|
| **Source:** Maharashtra Times | **Date:** 27 July 2017 |




निफ्टी १० हजारांवर गेल्यावर राष्ट्रीय शेअर बाजारात (एनएसई) विशेष घंटानाद करण्यात आला. त्यावेळी एनएसईचे एमडी व सीईओ विक्रम लिमये यांच्यासह आयआयएसएलचे अध्यक्ष एल. रवि शंकर व सीईओ मुकेश कुमार अगरवाल, एनएसईचे समूह अध्यक्ष जे. रविचंद्रन तसेच डॉटएक्सचे अध्यक्ष पी. एच. रविकुमार उपस्थित होते.

भारत ही सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असून निफ्टी हे त्याचे प्रतिबिंब आहे. निफ्टी वधारण्यामध्ये सर्व भागधारकांचा, ट्रेडिंग मेंबर्सचा, गुंतवणूकदार संस्थांचा, राष्ट्रीय शेअर बाजाराच्या चमूचा तसेच भांडवल बाजार नियंत्रकाचा मोठा वाटा आहे. देशाची अर्थव्यवस्था मध्यम तसेच दीर्घ काळात विकास करेल, याबद्दल मी आशावादी आहे.

\- विक्रम लिमये, एमडी व सीईओ, राष्ट्रीय शेअर बाजार